तरुण भारत
शुक्रवार, ३ जानेवारी २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये वाचन संकल्प उपक्रम

**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या डॉ. बापूजी साळुंखे इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटमध्ये महाराष्ट्र शासनाच्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये व तरुण पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि त्यांची वाचन कौशल्ये विकसित करणे हा आहे. पंधरवड्यामध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. संस्थेच्या व्यावसायिक शिक्षण समूहाचे संचालक प्राचार्य विरेन भिर्डी, इन्स्टिटयूटचे प्राचार्य डॉ. सुहास सपाटे आणि प्रा. अशोक कोळेकर यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून करण्यात आली. वाचनातून घडणाऱ्या सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिकत्वावर भाष्य केले. यावेळी वाचन कौशल्य कार्यशाळा घेण्यात आली, ज्यामध्ये प्रमुख मार्गदर्शक प्रा. अशोक कोळेकर यांनी विद्यार्थांना वाचनाचे महत्त्व, योग्य वाचन तंत्र, आणि वाचनातून होणारे शैक्षणिक व वैयक्तिक फायदे यावर विस्तृत मार्गदर्शन केले. त्यांनी वाचन कौशल्य वाढविण्यासाठी प्रात्यक्षिकेही सादर केली. ज्यामुळे विद्यार्थ्यांना वाचन कौशल्यांचा सराव करण्यास प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रामध्ये सामूहिक वाचन सत्र आयोजित करण्यात आले. पदवी आणि पदविका अभियांत्रिकीच्या अनेक विद्यार्थ्यांनी या सत्रात उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रा. तन्मय कुलकर्णी, प्रा. सुदर्शन महाडिक यांनी आयोजन केले. या उपक्रमासाठी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्रा. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. ग्रंथपाल महेश देसाई यांनी आभार मानले.

पुण्य नगरी
शनिवार, ४ जानेवारी २०२५



# अंकुश हाक्केचे मॅरेथॉन स्पर्धेत यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कलिंगा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स विद्यापीठ, भुवनेश्वर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ हाफ मॅरेथॉन स्पर्धेमध्ये अंकुश हाक्के याने तब्बल १ तास ६ मिनिटे २९ सेकंद वेळ देत स्पर्धा पूर्ण करत तृतीय क्रमांक पटकावला.

तो विवेकानंद महाविद्यालयात बी.ए. भाग ३ मध्ये शिकत आहे. जर्मनी येथे होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ हाफ मॅरेथॉन स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी तो पात्र ठरला आहे. त्याला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले. जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार आर. बी. जोग, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

04/01/25

4.1.25

सकाळ TODAY
कोल्हापूर, रविवार, ५ जानेवारी २०२५

# 'विवेकानंद'मध्ये वाचन उपक्रम

कोल्हापूर, ता. ४ : विवेकानंद महाविद्यालयातील ग्रंथालयातर्फे वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत सामूहिक वाचन उपक्रम झाला. दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी ग्रंथांचे सामूहिक वाचन केले. कार्यमांतर्गत सर्वांना ग्रंथालयात मुक्त प्रवेश दिला. तसेच १५ तारखेपर्यंत सामूहिक वाचन आणि विविध स्पर्धांचे ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुनीता शिर्के, डॉ. सरिता शिंदे, ग्रंथपाल डॉ. नीता पाटील, सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे, विद्यार्थिनी सृष्टी पाटील, छबी यादव, सारिका पवार, समृद्धी पाटील यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी पुस्तकांचे सामूहिक वाचन केले.

तरुण भारत संवाद

सोमवार ६ जानेवारी २०२५



कोल्हापूर :अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मॅरेथॉन स्पर्धेत यश मिळवलेल्या अंकुश हाक्केचे अभिनंदन करताना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार. सोबत डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, आदी.

# अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मॅरेथॉन स्पर्धेत अंकुश हाक्केचे यश

**कोल्हापूर :** कलिंगा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स विद्यापीठ भुवनेश्वर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ हाफ मॅरेथॉन स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालयाचा अंकुश हाक्के याने तब्बल १ तास ६. मिनिट २९ सेकंद वेळ देत स्पर्धा पूर्ण करत तृतीय क्रमांक पटकावला. त्यामुळे तो जर्मनी येथे होणाऱ्या जागतिक आंतर विद्यापीठ हाफ मॅरेथॉन स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी पात्र ठरला आहे. खेळाडूला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले. या खेळाडूंना जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार आर. बी. जोग, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत

बुधवार, ८ जानेवारी २०२५

# डॉ. लट्ठे यांचे संशोधन 'नेचर' मध्ये प्रकाशित

**कोल्हापूर :** येथील विवेकानंद कॉलेजमधील भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय लट्ठे यांचे दुर्मीळ साखरेवरील संशोधन 'नेचर" सायंटिफिक रिपोर्ट्स" मध्ये प्रसिद्ध झाले आहे. डॉ. संजय लट्ठे यांनी टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ अॅग्रिकल्चर अँड टेक्नॉलॉजी, जपानचे प्रा. डॉ. काझूया नाकाता व हेनान युनिव्हर्सिटी, चीनचे प्रा. शांहू लिऊ यांच्या संशोधनातील परस्पर सहकार्यातून दुर्मीळ साखरेवरील संशोधन पूर्ण केले.

हे संशोधन 'नेचर : सायंटिफिक रिपोर्टस या आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये नुकतेच प्रसिद्ध झाले. याबद्दल डॉ. लट्ठे यांचे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, प्रबंधक आर. बी. जोग यांनी अभिनंदन केले.

08/01/25

8/1/25

तरुण भारत
शुक्रवार, १० जानेवारी २०२५



कोल्हापूर : ज्ञानेश्वरी पाटीलचा सत्कार करताना स्वामी विवेकानंदचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे. सोबत डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे आदी

# राष्ट्रीय नेमबाजीमध्ये ज्ञानेश्वरी पाटीलला सिल्वर

प्रतिनिधी
कोल्हापूर

मध्यप्रदेश भोपाळ येथे झालेल्या ६७ व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाची एम. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स भाग दोनमध्ये शिकत असणारी विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी पाटील हिला ५० मी. थ्री पोजिशन एअर रायफलमध्ये सिल्वर पदक मिळाले. या यशाबद्दल ज्ञानेश्वरीचा स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या खेळाडूला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले. तर जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार आर. बी.जोग, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी
शुक्रवार, १० जानेवारी २०२५

# नेमबाजी स्पर्धेमध्ये ज्ञानेश्वरी पाटीलचे यश

**कोल्हापूर :** मध्य प्रदेश भोपाळ येथे झालेल्या ६७ व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाची एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स भाग दोनमध्ये शिकत असणारी विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी पाटील हिला ५० मी. थ्री पोझिशन एअर रायफलमध्ये सिल्व्हर पदक मिळाले. या यशाबद्दल तिचा श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तिला संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले. जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, रजिस्ट्रार आर. बी. जोग, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्यनगरी

सोमवार, १३ जानेवारी २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये ग्रंथ प्रदर्शन

कोल्हापूर : स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त तसेच वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत विवेकानंद महाविद्यालयातील ग्रंथालयातर्फे ग्रंथ प्रदर्शन झाले. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्‌घाटन स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले.



कोल्हापूर : ग्रंथ प्रदर्शनाची पाहणी करताना प्राचार्य अभयकुमार साळुंखे.

कार्यक्रमास सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सुनील कुलकर्णी, प्रबंधक आर. बी. जोग तसेच प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी स्वागत केले. सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले.

सकाळ

सोमवार, १३ जानेवारी २०२५

# 'विवेकानंद'मध्ये ग्रंथ प्रदर्शन

कोल्हापूर : स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त तसेच 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमांतर्गत विवेकानंद महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सुनील कुलकर्णी, प्रबंधक आर. बी. जोग आदी उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी स्वागत केले. सहायक ग्रंथपाल श्री. हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले.

पुढारी

सोमवार, १३ जानेवारी २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये ग्रंथ प्रदर्शन

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त तसेच वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत विवेकानंद महाविद्यालयातील ग्रंथालयातर्फे ग्रंथप्रदर्शन झाले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन झाले. ग्रंथ प्रदर्शनात स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनावरील ग्रंथ, भारतीय संगीत व कला तसेच दुर्मीळ ग्रंथ ठेवले. सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांनी, विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद यांचे विचार आत्मसात करण्याचा संदेश साळुंखे यांनी दिला. सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सुनील कुलकर्णी, प्रबंधक आर. बी. जोग, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी स्वागत केले. सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले.

# 'विवेकानंद'च्या निशाची आर्मी डे परेडसाठी निवड

**कोल्हापूर :** पुणे येथे होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवर सेना दिवस परेड एन.सी.सी. ट्रूपमध्ये विवेकानंद महाविद्यालयातील निशा अमर बजागे हिची निवड झाली आहे. तिला ६ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, मेजर सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रबंधक रघुनाथ जोग यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

सकाळ
, गुरुवार, १६ जानेवारी २०२५

# आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत ऋषिकेश कबनूरकरचे यश



कबनूरकर

**कोल्हापूर :** स्वर्गीय मनोहर पर्रीकर गोवा इंटरनॅशनल खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषिकेश कबनूरकरने आठ गुणांसह चौथा क्रमांक पटकाविला. श्यामाप्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियममध्ये झालेल्या या स्पर्धेत देशातील दोन हजार खालील फिडे मानांकन असलेले बुद्धिबळपटू सहभागी झाले होते. यात दुसऱ्या पटावर खेळणाऱ्या ऋषिकेशने गुजरातच्या रूद्र फाटक यांच्यासोबत दहाव्या फेरीअखेर १८ चालीत बरोबरी राखली. त्याने आठ गुणांसह चौथा क्रमांक मिळवला. त्याला ९० हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह मिळाले. या स्पर्धेतील कामगिरीवर त्याची फिडे मानांकनात तब्बल १३६ गुणांची वाढ झाली. ऋषिकेश विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी असून, त्याला प्रशिक्षक कृष्णात पाटील, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखानाप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

17.1.25

पुण्य नगरी

नगरी

शुक्रवार, १७ जानेवारी २०२५

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची कृषी महाविद्यालयास भेट

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील बी.एस्सी. भाग ३ बॉटनी (वनस्पतीशास्त्र) विभागातील विद्यार्थ्यांनी विविध कृषी विभागांची माहिती घेण्यासाठी कृषी महाविद्यालयास भेट दिली. ही भेट विवेकानंद कॉलेज व एलेक्झिट इन्ग्रेडिएंटस्, कोल्हापूर यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. या भेटीअंतर्गत तेथील अधिकारी डॉ. कारंडे, डॉ. सरवदे, डॉ. पतंगे व डॉ. पाटील व त्यांच्या विभागातील विद्यार्थ्यांनी जैविक खतनिर्मिती, गांडूळ खतनिर्मिती, डेअरी प्रॉडक्ट तसेच फळांपासून निर्माण केलेले विविध पदार्थ व त्यांची पाककृती याबद्दल माहिती विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांना दिली. प्रा. डॉ. अभिजित कासारकर यांनी या भेटीचे आयोजन केले होते. या भेटीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

शुक्रवार, १७ जानेवारी २०२५

# यशासाठी मनाची एकाग्रता आवश्यक : स्वामी बुद्धानंद

कोल्हापूर, ता. १६ : 'जीवनात यशप्राप्ती करण्यासाठी मनाची एकाग्रता आवश्यक आहे. मनाला एकाग्र करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच आजच्या धकाधकीच्या जीवनात ध्यानयोग साधना करा. चांगली संगत, पुस्तके, चांगल्या विषयांवरील चर्चा या गोष्टींना जीवनात स्थान द्या. सर्व प्रकारच्या प्रलोभनापासून सर्वांनी दूर राहा,' असा संदेश स्वामी बुद्धानंद यांनी दिला. विवेकानंद कॉलेजमध्ये स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहनिमित्त तसेच वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत ग्रंथालय आणि आय.क्यू.ए.सी. विभागातर्फे 'मनाची एकाग्रता' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांसह रजिस्ट्रार आर. बी. जोग, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी प्रास्ताविक केले. सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी स्वागत केले. डॉ. कैलास पाटील यांनी परिचय करून दिला. प्रा. समीक्षा फराकटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. दीपक तुपे यांनी आभार मानले.

पुढारी
शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०२५

# 'विवेकानंद'मध्ये आज डॉ. अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज येथे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा वाढदिवस ज्ञानशिदोरी दिन म्हणून साजरा होत आहे. त्यानिमित्ताने शुक्रवार (दि. १७) रोजी सकाळी १० वाजता लेखक डॉ. अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

डॉ. गोडबोले 'माझा लेखन प्रवास आणि आजचे शिक्षण' विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, श्रीराम साळुंखे आदी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले आहे. १

पुण्य नगरी
दि. १७.०१.२०२५

# शरयूची गिर्यारोहण कॅम्पसाठी निवड

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाची एनसीसी छात्र सीनिअर अंडर ऑफिसर शरयू सुतार (बी. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स) हिची



जम्मू-काश्मीर येथे होणाऱ्या गिर्यारोहण आणि हिवाळी खेळ या साहसी प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. तेथे तिला बर्फातील खेळांचे प्रशिक्षण मिळणार आहे. निवडीबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. छात्रास ६ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल संधान मिश्रा, मेजर सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी
शनिवार,
१८ जानेवारी २०२५

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची कृषी महाविद्यालयास भेट

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी कृषी महाविद्यालयास शैक्षणिक अभ्यास भेट दिली. विवेकानंद कॉलेज व एलेक्झिट इन्ग्रेडिएंटस, कोल्हापूर यांच्या सहकार्याने ही भेट घडवून आणली गेली. भेटींतर्गत तेथील अधिकारी डॉ. कारंडे, डॉ. सरवदे, डॉ. पतंगे व डॉ. पाटील, विभागातील विद्यार्थ्यांनी जैविक खतनिर्मिती, गांडुळ खत निर्मिती, डेअरी प्रॉडक्ट् तसेच फळांपासून निर्माण केलेले विविध पदार्थ व त्यांची पाककृती याबद्दल माहिती दिली. प्रा. डॉ. अभिजित कासारकर यांनी भेटीचे नियोजन केले. यासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले.

लोकमत
शनिवार
१८
जानेवारी २०२५

# नोकऱ्या घटणार, नव्या वाटा शोधाव्या लागतील

## अच्युत गोडबोले : 'एआय'चा होणार परिणाम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय)मुळे येत्या ५ ते १० वर्षांमध्ये जगभर सर्वच क्षेत्रात क्रांती होणार आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रांतील नोकऱ्या काही प्रमाणात कमी होतील, हे खरे असले तरी ज्यांना नावीन्यपूर्ण गोष्टी शिकण्याची आवड आहे. बदलत्या तंत्रज्ञानाला आत्मसात करून रोजगाराच्या नवनवीन वाटा शोधण्याचे कौशल्य ज्यांच्याकडे आहे, त्यांना काळजी करण्याचे काहीच कारण नाही, असा दिलासा लेखक अच्युत गोडबोले यांनी दिला. रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मिडटाऊनच्या वतीने विवेकानंद महाविद्यालयात आयोजित व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते.



कोल्हापुरातील स्वामी विवेकानंद महाविद्यालयामध्ये रोटरी क्लब मिडटाउनच्या वतीने अच्युत गोडबोले यांचे व्याख्यान झाले. यावेळी बी. एस. शिंपुकडे, रमेश खटावकर, ए. व्ही. देशपांडे, प्राचार्य आर. आर. कुंभार उपस्थित होते.

मिडटाउनच्या अध्यक्षा अरुंधती महाडिक यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम घेण्यात आला. व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी रोटरीचे सचिव बी. एस. शिंपुकडे, रमेश खटावकर, निवृत्त न्यायाधीश ए. व्ही. देशपांडे, प्राचार्य आर. आर.. कुंभार, आदी उपस्थित होते.

गोडबोले म्हणाले, संगणक आल्यानंतर सुरुवातीला अशीच भीती घातली जात होती. मात्र, आज संगणक जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. त्याचप्रमाणे एआयही जीवनातील महत्त्वपूर्ण भाग व्यापून टाकेल. आपण मशीनला जो डाटा पुरवतो, त्याच डाट्याचा वापर करून आवश्यक ती माहिती पुरवली जाते.

याच सूत्रानुसार 'एआय' तंत्रज्ञानाचा पाया रचला गेला आहे. सध्या जगभरातील डाटा संकलित करण्याचे काम सुरू आहे. शेतकरी आपल्या जमिनीचा कस आणि क्षेत्रफळ पाहून कोणती खते किती प्रमाणात द्यायची, हे 'एआय' कडून मार्गदर्शन घेईल आणि घरात बसून ड्रोनद्वारे शेती करता येईल.

यामुळे नोकऱ्या कमी होणार असल्या तरी आपल्या क्षेत्रामध्ये ज्यांनी दीर्घकाळ काम केलेले आहे आणि ज्यांना नवतंत्रज्ञान शिकण्याची आवड आहे, त्यांना एआय तंत्रज्ञानाचा फायदाच होईल. यावेळी प्रा. अशोक पाटील यांच्यासह रोटरी मिडटाउनचे सदस्य आणि विद्यार्थी उपस्थित होते.

रविवार, १९ जानेवारी २०२५

तरुण भारत संवाद

# मुलींनी शिक्षणासह स्वसंरक्षण करावे

## पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांचे आवाहन : भद्रकाली ताराराणी पुरस्काराने पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांचा सन्मान


प्रतिनिधी

कोल्हापूर

मेळघाटातील आदिवासी समाजाला शिक्षण मिळालेले नाही. आजही तेथील शाळा शिक्षक विरहीत चालतात. परंतू तेथे महिलांना पूर्ण स्वातंत्र्य असून त्या बिनधास्तपणे जगतात. परंतू सुशिक्षत समाजात आजही मुलींना स्वातंत्र्य नाही, हे दुर्दैव आहे. तसेच मुलींनी शिक्षणाबरोबर कष्ट करून स्वत:चे संरक्षण केले पाहिजे, असे आवाहन पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांनी विद्यार्थीनींना केले.

ताराराणी विद्यापीठ व मौनी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दिला जाणार 'भद्रकाली ताराराणी पुरस्कार' पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांना देऊन गौरवण्यात आले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.

डॉ. कोल्हे म्हणाल्या, आदिवासी समाजाकडून मी खूप काही शिकले, मुली तेथे स्वत:चे लग्न स्वतः करतात.



कोल्हापूर : खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हंस्ते 'भद्रकाली ताराराणी पुरस्कार' स्वीकारताना पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे. सोबत अशोक पवर्ते-पाटील, डॉ. एस. एन. पवार, डॉ. रविंद्र कोल्हे, डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. प्रकाश हिलगे, सचिव डॉ. प्राजक्त पाटील.

आदिवासी समाजात स्त्रीभ्रूणहत्या होत नाही. स्त्रीप्रधान संस्कृती असल्याने मुलींसाठी तीन मुलांनंतरही प्रतीक्षा करणारी अनेक कुटुंब आहेत. मुलगी जन्माला आल्यानंतर आनंदोत्सव साजरा केला जातो. स्त्री-पुरूष समानता आहे. तेथे महिलांना पूर्णतः स्वातंत्र्य आहे. तेथे कोणीही आत्महत्या करीत नाहीत. आदिवासी समाजातील अंधश्रध्दा, अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला. परंतू त्यांची संस्कृती संवर्धन केली आहे. कष्टामुळेच तेथील महिला समोरच्याशी दोन हात करू शकतात, म्हणून मुलींनी कष्ट करायला शिकले पाहिजे. स्वत:चे जेवण स्वत: तयार केले पाहिजे. कारण महिलाच जगाचे चित्र बदलू शकतात. तुम्हीच खऱ्या ताराराणीच्या वारसदार आहात, म्हणून कष्ट करायला शिका, असा सल्ला त्यांनी विद्यार्थिनींना दिला.

खासदार श्रीमंत शाहू छत्रपती म्हणाले, डॉ. कोल्हे दाम्पत्यांनी आदिवासी लोकांना चांगले जीवन दिले. त्यांना कायदे शिकवत हक्क मिळवून दिले. महिलांना त्यांचे अधिकार माहित आहेत, परंतू आपल्याकडे महिलांना अद्याप हक्क दिले जात नाहीत. डॉ. स्मिता कोल्हे याच खऱ्या ताराराणी आहेत. आदिवासींच्या हक्कासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले आहे. त्यांचे कार्य प्रत्येक महिलेसाठी प्रेरणादायी आहे.

प्रास्ताविक ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले. डॉ. सुजय पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सोनल चव्हाण यांनी गौरवपत्राचे वाचन केले. पौर्णिमा मंडलिक यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष अशोक पवर्ते-पाटील, डॉ. एस. एन. पवार, डॉ. प्रकाश हिलगे, सचिव डॉ. प्राजक्त पाटील, डॉ. रविंद्र कोल्हे, आदी उपस्थित होते.

तरुण भारत
रविवार १९ जानेवारी २०२५

# 'एआय'मुळे सर्वच क्षेत्रात क्रांती घडणार

## ज्येष्ठ वक्ते अच्युत गोडबोले : नवतंत्रज्ञान आत्मसात करणाऱ्यांसाठी आर्टिफिशिअल इंटेलिजन्स फायदेशीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

आर्टिफिशिअल इंटेलिजन्समुळे (एआय) पुढील ५ ते १० वर्षांमध्ये जगभर सर्वच क्षेत्रात क्रांती होणार आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रातील नोकऱ्या काही प्रमाणात कमी होतील. हे वास्तव असले तरी ज्यांना नाविन्यपूर्ण गोष्टी शिकण्याची आवड आहे. बदलत्या तंत्रज्ञानाला आत्मसात करून रोजगाराच्या नवनवीन वाटा शोधण्याचे कौशल्य ज्यांच्याकडे आहे, त्यांना काळजी करण्याचे कारण नाही. कॉम्प्युटरप्रमाणे एआयही जीवनातील महत्त्वपूर्ण भाग व्यापून टाकेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ वक्ते अच्युत गोडबोले यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मिडटाऊनच्यावतीने विवेकानंद कॉलेजमध्ये झालेल्या व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. रोटरी मिडटाऊनच्या अध्यक्षा अरूंधती महाडिक यांच्या संकल्पनेतून व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी गोडबोले म्हणाले, आपण मशीनला जो डाटा पुरवतो, त्याच डाटाचा वापर करून, मशीन आपल्याला आवश्यक ती माहिती पुरवते. लहान मुलांमध्ये कोणत्याही प्रकारचा डाटा नसतो, मात्र आपल्या भोवती असलेली माणसे जे बोलतात त्याचे अवलोकन करून, ते बोलायला शिकते. याच सुत्रानुसार एआय तंत्रज्ञानाचा पाया रचला गेला आहे. सध्या जगभरातील डाटा संकलीत करण्याचे काम सुरू आहे. येत्या पाच वर्षात सर्वच क्षेत्रामध्ये एआय तंत्रज्ञानामुळे क्रांती झाली असेल. त्यामुळे जगभरातील बँका, शाळा, कॉलेज, रिअल इस्टेट व्यवसाय, पत्रकारिता, रिटेल आणि होलसेल मार्केटींगसह शेती क्षेत्रामध्येही अमुलाग्र बदल होईल.

शेतकरी एआयद्वारे जमीनीचा कस, क्षेत्रफळ पाहून कोणती खते किती प्रमाणात द्यायची हे एआयकडून मार्गदर्शन घेईल आणि घरात बसून ड्रोनद्वारे शेती करेल. तंत्रज्ञानाच्या दोन बाजू असतात. त्याप्रमाणे एआय तंत्रज्ञानालाही चांगली आणि वाईट बाजू आहे. त्या दृष्टीनेही जगभर विचार प्रक्रिया सुरू आहे, असेही ते म्हणाले. यावेळी रोटरीचे सचिव बी. एस. शिंपुकडे, रमेश खटावकर, निवृत्त न्यायमूर्ती ए. व्ही. देशपांडे, प्राचार्य आर. आर. कुंभार, अशोक पाटील आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : रोटरी मिडटाऊनतर्फे आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना अच्युत गोडबोले. सोबत उपस्थित अन्य मान्यवर.

तरुण भारत
मंगळवार २१ जानेवारी २०२५

# विवेकानंदच्या समिधा घुगरेची प्रजासत्ताक दिन परेडसाठी निवड



**कोल्हापूर :** दिल्ली येथे २६ व २७ जानेवारी २०२५ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित होणाऱ्या परेड व पंतप्रधान रॅलीसाठी विवेकानंद कॉलेजमधील एन.सी.सी. छात्र सिनिअर अंडर ऑफिसर समिधा घुगरे (बी.कॉम.भाग २) हिची निवड झाली आहे. या परेडसाठी तिचा दिल्ली येथे सराव सुरु आहे. समिधा ही ६ महाराष्ट्र गर्ल्स एन सी सी बटालियनमधून निवड झालेली एकमेव छात्र आहे. कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. कर्नल संधान मिश्रा, मेजर सुनिता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रा. सनी काळे, प्रबंधक रघुनाथ जोग यांचे मार्गदर्शन लाभले.

2 २१०।।२०२५

बुधवार, २२ जानेवारी २०२५



In Short

# विवेकानंद कॉलेजच्या समिधाची प्रजासत्ताक दिन परेडसाठी निवड



**कोल्हापूर :** दिल्ली येथे दि. २६ व २७ जानेवारी रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित होणाऱ्या परेड व पंतप्रधान रॅलीसाठी विवेकानंद कॉलेजची एनसीसी छात्र सिनिअर अंडर ऑफिसर समिधा घुगरे (बी.कॉम. भाग २) हिची निवड झाली आहे. या परेडसाठी तिचा दिल्ली येथे दि. १ जानेवारीपासून सराव सुरू आहे. निवडीबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले.

सकाळ
बुधवार, २२ जानेवारी २०२५




वसगडे (ता. करवीर) : येथे स्वामी विवेकानंद कॉलेजच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्‍घाटनप्रसंगी बोलताना कौस्तुभ गावडे. यावेळी उपस्थित मान्यवर.

# युवकांनी श्रमाच्या माध्यमातून संस्कार जपावेत : कौस्तुभ गावडे

## वसगडेत 'विवेकानंद'चे श्रमसंस्कार शिबिर

सांगवडेवाडी, ता. २१ : विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वाची आहे. युवकांनी श्रमाच्या माध्यमातून संस्कार जपावेत आणि शारीरिक श्रमाबरोबर आदर्शवादी समाजाची कौशल्य प्राप्त करून घ्यावीत, असे आवाहन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले.

वसगडे (ता. करवीर) येथे विवेकानंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष संस्कार शिबिराच्या उद्‍घाटनप्रसंगी ते बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षस्थानी होते. ते म्हणाले, "राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी प्रत्येकी एक अशिक्षित व्यक्तीला शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्याचे आव्हान स्वीकारावे."

उद्‍घाटनप्रसंगी वसगडेच्या सरपंच योगिता बागडी, शोभा राजमाने, प्रा. पी. आर. बागडे, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. जी. एस. उबाळे, प्रा. संपदा ठिपकुर्ले, एम. आर. माने, प्रा. जी. के. सोनटक्के, ग्रामस्थ, विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. डॉ. राजश्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. एल. एस. नाकाडी यांनी आभार मानले.

20/1/2025

22.1.25

पुढारी

बुधवार, २२ जानेवारी २०२५

# डॉ. बापूजी साळुंखे यांनी विवेकवादी तत्त्वे जोपासली

## डॉ. अच्युत गोडबोले; स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत ज्ञानशिदोरी दिन



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजने आयोजित ज्ञानशिदोरी दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना लेखक डॉ. अच्युत गोडबोले. सोबत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आदी. (छाया : पप्पू अत्तार)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी आयुष्यभर विवेकवादी तत्त्वे जोपासली. त्यांचा जीवनप्रवास प्रेरणादायी असून त्याच विचारांचा वसा व वारसा गेली ४० वर्षे समर्थपणे सांभाळला जात असल्याचे प्रतिपादन डॉ. अच्युत गोडबोले यांनी केले.

विवेकानंद कॉलेजने आयोजित 'ज्ञानशिदोरी दिन' कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

डॉ. गोडबोले म्हणाले, अनेक क्षेत्रात लेखन केले असले तरी मी कोणत्याही विषयातील तज्ज्ञ आहे असे मानत नाही. विज्ञान तंत्रज्ञानापेक्षा संगीतादी कलाही महत्त्वाच्या आहेत.

प्राचार्य साळुंखे म्हणाले, वाचन संस्कृती वाढावी यासाठी ज्ञानशिदोरी हा उपक्रम स्तुत्य आहे. डॉ. साळुंखे यांनी माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे हा विचार सर्वदूर पसरवला आहे. प्राचार्या शैलजा साळुंखे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे यांनी सूत्रसंचालन केले. संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे (सहसचिव अर्थ), प्राचार्य सिताराम गवळी (सहसचिव प्रशासन), श्रीराम साळुंखे, कोल्हापूर विभागप्रमुख बी. बी. अपराध, आर. के. भोसले, प्राचार्य विरेन भिर्डी, प्राचार्य धनराज भोसले, रजिस्ट्रार आर. बी. जोग उपस्थित होते.

पुढारी

रविवार, २६ जानेवारी २०२५ ।

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी समाजाची नाळ जोडता येते : डॉ. चौगले

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा व नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वाची आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी समाजाची नाळ जोडता येते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयाच्या मौजे वसगडे (ता. करवीर) येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. प्रा. पी. आर. बागडे यांनी प्रास्ताविक केले. सुयश झुणके यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी. एस. उबाळे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. एस. पी. थोरात, कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील, प्रा. राजश्री पाटील, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. संपदा टिपकुर्ले, ज्युनिअर एन.एस.एस. विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एल. एस. नाकाडी, प्रा. सी. सी. पाटील, प्रा. नयना पाटील उपस्थित होते

28/01/2025

28.1.25

तरुण भारत

मंगळवार, २८ जानेवारी २०२५

## विवेकानंद कॉलेज

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सेवानिवृत्त तसेच पीएच.डी. पदवी प्राप्त केलेल्या, सेट परीक्षा उत्तीर्ण व पुस्तक लेखक, प्रकाशक या गुणवंत प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. बी. टी. दांगट डॉ. विकास जाधव, कॅप्टन सुनिता भोसले, लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा, प्रा संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, आर. बी. जोग आदी उपस्थित होते.

28/01/2025

28.1.25

पुण्य नगरी

मंगळवार, २८ जानेवारी २०२५

# 'विवेकानंद'च्या पंचवीस विद्यार्थ्यांची प्लेसमेंटद्वारे निवड

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल विभागाकडून बजाज कॅपिटल, कोल्हापूर, रिलायन्स निपॉन लाईफ इन्शुरन्स व आयबीएफ ॲक्सीस बँक, पुणे या तीन कंपन्यांत भरतीसाठी मुलाखती झाल्या. यात कॉमर्स व मॅनेजमेंट शाखेच्या ७० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यातून २५ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड करण्यात आली.

यावेळी बजाज कॅपिटलचे सिटी मॅनेजर अझिम शेख, आयबीएफ (ॲक्सीस बँक) डेप्युटी मॅनेजर शुभांगी खुडे व रिलायन्स निपॉन लाईफ इन्शुरन्सचे नीलेश पांडेकर, सीनिअर टेरीटरी मॅनेजर उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. अभयकुमार साळुंखे, सचिवा प्रा. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले. निवडीसाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व डॉ. श्रुती जोशी यांचे सहकार्य लाभले. प्लेसमेंट ड्राईव्हच्या नियोजनासाठी ट्रेनिंग व प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. सतीश चव्हाण, सदस्य प्रा. संजय थोरात, डॉ. संजय लठ्ठे, डॉ. राजश्री पाटील, प्रा. विजय पुजारी, डॉ. अस्मिता तपासे, प्रा. पल्लवी देसाई, प्रा. राहुल इंगवले, प्रा. व्ही. व्ही. मिसाळ, प्रा. ए. एल. उपाध्ये, डॉ. ए. आर. कासारकर यांनी परिश्रम घेतले.

सकाळ
शुक्रवार, ३१ जानेवारी २०२५



वसगडे (ता. करवीर) : येथे विवेकानंद कॉलेजच्या श्रमसंस्कार शिबिर सांगता समारंभात बोलताना डॉ. टी. एम. चौगुले व मान्यवर.

# वसगडेत विवेकानंदच्या श्रमसंस्कार शिबिराची सांगता

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वाची आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी व्यक्त केले. विवेकानंद महाविद्यालयाच्या वसगडे (ता. करवीर) येथे सुरू असलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'एनएसएसच्या शिबिरातून विद्यार्थ्यांनी स्वतःचा शोध घ्यावा.' या शिबिरासाठी हितेंद्र साळुंखे, रजिस्ट्रार आर. बी. जोग, एस. पी. देसाई, ई. जी. मंगल, आर. एम. बोंगे, सदानंद दुर्गुळे यांचे सहकार्य लाभले. यावेळी प्रा. एस. पी. थोरात, प्रा. राजश्री पाटील, डॉ. बी. टी. दांगट, डॉ. संपदा टिपकुर्ले, प्रा. सी. सी. पाटील, प्रा. नयना पाटील उपस्थित होते. प्रा. पी. आर. बागडे, कार्यक्रम अधिकारी यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. सुयश झुणके यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी. एस. उबाळे यांनी आभार मानले.

31/01/2025
PE 31.1.25
S